# स्वतःत बदल करतो तो शिक्षक

शिकवतो तो शिक्षक, अशी सर्वसाधारणपणे 'शिक्षकाची व्याख्या केली जाते. ही खरी तर खूपच व्यापक व्याख्या आहे. प्रत्येकजणच आपल्या जीवनव्यवहारात दुस-या कुणाला किंवा अनेकांना काही न काही शिकवीत' असतो; त्यामुळे त्या त्या क्षणांचा तो शिक्षकच असतो. प्रौढ माणसे अनेक प्रकारचा उपदेश मुलांना करीत असतात, तेव्हा ते सारे प्रौढ लोक, शिक्षकाच्या भूमिकेतच शिरत असतात. शिक्षकाच्या भूमिकेतच, शिक्षक हा वरचढ आणि शिकणारा हा दुय्यम अशी एक वर्गवारी अनुस्यूत असते. ही वर्गवारी शिकविणारा आणि शिकणारा यात एक अंतर राखते.

शिक्षकाची ही अशी भूमिका पूर्वापारपासून चालत आलेली आहे. तिची पाळेमुळे संस्कृतीच्या भूमीत खोलवर रुजलेली आहेत. शिक्षकाच्या या भूमिकेत एक सांस्कृतिक नैसर्गिकता आणि सामाजिक गरज दडलेली आहे. मागच्या पिढीने आपले जगण्याचे इंगित व त्यासाठी लागणारे सांस्कृतिक संचित पुढील पिढीस देण्याची ही प्रथा जीवन सातत्याच्या दृष्टिने आवश्यक अशीच आहे. साहजिकच, देणा-याचे हात वर आणि घेणा-याचे हात खाली असे असणारच.

जेव्हा संस्कृतीचे संचित पुढील पिढीस द्यायचे असते, तेव्हा त्याची सतत गरजेनुसार निवड करीत जावे लागते. ही निवड काळानुसार बदलत जाते. जसजसा काळ पुढे जातो तसतसा माणसाच्या जीवनव्यवहारांत बदल होत जातो. हा बदल अनेक गोष्टींमुळे घडून येतो. अनेक शास्त्रांच्या विकसनांतून उपलब्ध होणारे शास्त्रज्ञान बदलत जाते, तंत्रज्ञान तर वेगाने बदलून माणसांच्या सर्वसाधारण गरजांमध्येही बदल करीत जाते. ज्ञानाचे क्षेत्र, कलाक्रीडांची क्षेत्रे, व्यवसाय-व्यवहारांची क्षेत्रे बदलत जाऊन, माणसांची जीवनशैलीच बदलत जाते आणि माणूस मनाने या बदलांना जुळवून घेत जातो. या सा-या घटनांचे प्रतिबिंब शिक्षणात पडावे लागते.

शिक्षण हे नेहमीच भावीकालाभिमुख असते. आज, शाळा-महाविद्यालयांतून शिकत असणा-या विद्यार्थ्यांच्या भावी जीवनातील गरजांशी ते शक्य तो मिळते-जुळते झाले तर, शिक्षण उपयुक्त ठरते अन्यथा शिक्षणात होणारी वैयक्तिक व सामाजिक गुंतवणूक वाया जाण्याचा संभव असतो. त्यामुळे साहजिकच, भावी कालांतील बदलांचा वेध घेत घेत 'आज' च्या शिक्षणात बदल घडवत जावे लागते. म्हणून शिक्षण हे कालानुसार बदलते म्हणजे प्रवाही असावे लागते.

अशा प्रवाही वातावरणात शिक्षकाला काम करावे लागते. एक काळ असा होता की, हा बदलांचा प्रवाह अगदी मंदगती होता: इतका की. दोन पिढ्यांच्या जीवनव्यवहारांत फारसा फरक नसायचा त्यामळे, शिक्षण व्यवहारातही एक निश्चितता आली होती. काय नि कसे शिकवायचे याचे ठोस निर्णय दीर्घकालपर्यंत बदलण्याची फारशी गरज नव्हती. शिक्षण हे पठडीबध्द होते. त्यांत काळानुसार अल्पशा सुधारणा करून भागत होते. त्यामुळे शिक्षकाचे कामही ठरीव असे होते. शिक्षण हे क्रमिक पुस्तकांत, शाळेच्या बंदिस्त वातावरणात, शिस्त-शिक्षांच्या आणि स्पर्धा-परीक्षांच्या ठराविक साच्यांत निबध्द करता येत होते. त्यामुळे ते शिक्षकांसह सर्व संबंधित घटकांना सोपे, सोयीचे आणि शिक्षक-विद्यार्थी यांच्याकडून प्रथा-परंपरा पाळण्याच्या अपेक्षा ठेवून चालण्यासारखे होते.

परंतु आता शिक्षण आंतर्बाह्य बदलले आहे, वेगाने बदलते आहे. ही विसाव्या शतकाच्या मध्यापासून सुरू झालेली बदलांची ही प्रक्रिया, पुढे वाढत्या वेगाने एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत पोचली आणि पुढे एकविसाव्या शतकांत ती अखंड चालू राहील असे दिसते आहे. आपण, आज, एकविसाव्या शतकाच्या दुस-या दशकात, शिक्षणाचा विचार करताना, तो या शतकाच्या चौथ्या-पाचव्या दशकांपर्यंतच्या म्हणजे पुढील तीस-चाळीस वर्षांचा विचार करून, आपल्या आजच्या शिक्षणाची मांडणी करावी लागेल. याचे कारण असे की, वेगाने बदलत्या काळाचा वेध फार दीर्घ काळाचा घेता येणार नाही. दुसरे असे की, भारतीय बदलत्या परिस्थितीत, २०३० ते २०५० या कालावधीतील लोकसंख्याविषयक चित्र असे आहे की, देशातील बहुसंख्या ही तिशीच्या वयाभोवतीच्या तरूणांची असणार आहे. याला 'लोकसंख्या रचनेचा लाभ' (Demographic dividend ) म्हणून ओळखले जाते. जगाच्या स्तरावर भारताला हा मिळणारा लाभ ही घटना भारताच्या आर्थिक-सामाजिक-शैक्षणिक विकासपथावरील एका महत्त्वाची आणि आव्हानात्मक घटना मानली जाते.

एकविसाव्या शतकाच्या मध्याला तरुण असणारी ही पिढी आज आपल्या शाळा-महाविद्यालयांतून शिक्षण घेते आहे, आणि हे 'शिक्षण' त्यांच्या नंतरच्या गरजांना साजेसे असे मिळाली पाहिजे असा आपला संकेत आहे. हे घडविण्याचा निर्णय हा शिक्षणात पायाभूत बदल घडवून आणणारा आहे.

ठोकळ मानाने, तीन बदल व्हावे लागतील ते शिक्षकांच्या कार्याशी संबंधित आहेत.

• पहिला बदल आहे तो शिक्षणाच्या उद्दिष्टांमधील  बदल. आता शिक्षणाची उद्दिष्टे देखील गतिमानता धारण करतील. ती बदलत्या काळाला पोटात घेणारी अशी असतील; बदलत्या काळाला पुरून उरतील अशी ती असतील.

१. विचारशीलतेचा विकास

२. कल्पनाशक्तीचा विकास

३. बदलत्या काळाशी जुळवून घेण्याच्या व समस्या निवारणाच्या क्षमतेचा विकास

४. दुस-यांच्या भाव-भावनांशी जुळवून घेण्याच्या मानसिकतेचा विकास

५. स्वतःच्या भाव-भावनांवर विवेकपूर्ण नियंत्रण ठेवण्याच्या मानसिकतेचा विकास.

दुसरा बदल आहे तो शिक्षणाच्या पध्दतींमधील  बदलांचा. आज आपण हा बदल होणे अपरिहार्य आहे असे निदान शिक्षणक्षेत्रात तरी स्वीकारले आहे. अलीकडे, वर्तनवादी विचारसरणीला छेद देऊन रचनावादी विचारसरणी पुढे सरसावली आहे. ही पध्दती शिकणा-या विद्यार्थ्याला मध्यवर्ती ठेवून त्यांच्या कृतिशील स्वयंशिक्षणाला गती देणारी आहे. साहजिकच शिक्षकाची 'शिक्षक' म्हणून असणारी भूमिका ही या शिक्षणपध्दतीत बदलली आहे. त्याला आता शिक्षककेंद्री' नव्हे तर विद्यार्थीकेंद्री व्यवस्थेत आपले काम करायचे आहे. साहजिकच त्याला आपल्या भूमिकेला नवे वळण द्यायचे आहे. 'शिकण्याला सहाय्य करतो तो शिक्षक ही आता नवी भूमिका आहे. तिसरा बदल आहे तो शिक्षकाच्या मानसिकतेतील बदल. शिक्षणाच्या नव्या उद्दिष्टांना त्याला सामोरे जायचे आहे, नव्या पध्दती आत्मसात करून त्याला वापरायच्या आहेत. यासाठी जुन्या पठडीबध्द

शिक्षणावरील श्रद्धेला जाणारे तडे त्याला सोसायचे आहेत. मुख्य म्हणजे नव्या काळाची नवी आव्हाने पेलण्याची, नव्या रूपातील विद्यार्थ्यांना घडविण्याची आणि आपल्या नव्या भूमिकेला जुळवून घेण्याची मानसिकता त्याला प्राप्त करायची आहे; आणि नव्या काळातील चांगला शिक्षक होण्यासाठी, नवी मानसिकता त्याला आपली आपणच तयार करायची आहे.

हे काम जेवढे गरजेचे, तातडीचे, तेवढेच ते आव्हानांचे व आनंदाचे आहे हे मात्र नक्की!

❖